महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, छत्रपती संभाजीनगर – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र: विकाछसं/शिक्षण/२०२३/ 3714 दिनांक :- 25/10/2023

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित
पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,
छत्रपती संभाजीनगर विभाग.

**विषय :** - **शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ करिता, डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आल्याबाबत....**

संदर्भ :
१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२३-२४/२४२ दि. २०/१०/२०२३.
२. महाआयटी यांचे दि. ०४/१०/२०२३, दि. ११/१०/२०२३ रोजी ईमेलद्वारे प्राप्त संदेश.
३. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शा. नि. क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४/दि. ०७/१०/२०१७
४. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२३-२४/२४३, दि. २०/१०/२०२३.

आपणास कळविण्यात येते की, २०१८-१९ पासून महाराष्ट्र राज्य शासनाच्या योजनांसाठी माहिती व तंत्रज्ञान विभाग मंत्रालय (डी.आय.टी.) यांचेकडुन महाडीबीटी पोर्टल (संकेतस्थळ https://mahadbtmahait.govt.in) बनविण्यात आलेले असून त्यामध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभाग व अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या खालील योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना (भाग-१ वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)

संदर्भीन पत्रांनुसार या कार्यालयाच्या अधिनस्त असणाऱ्या व महाडीबीटी पोर्टलवर नोंदणीकृत असणाऱ्या सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / विना-अनुदानित संस्थाप्रमुखांना, संस्थेत प्रवेशित सर्व पात्र विद्यार्थ्यांकडून संबंधीत योजनांचे, शैक्षणिक वर्ष 2023-24 करीता नवीन व नूतनीकरणाचे अर्ज, महाडीबीटी पोर्टलद्वारे तात्काळ भरुन ऑनलाईन मंजूरीबाबत पाठविण्याबाबत कार्यवाही करण्याचे कळविण्यात आलेले आहे. त्यानूसार आपल्या संस्थेतील प्रवेशित सर्व पात्र विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया तात्काळ सुरु करण्यात यावी.

सदर प्रक्रिये संबंधी खालील सुचनांची / बाबींची नोंद घेऊन आपल्या संस्थास्तरावर तात्काळ कार्यवाही सुरु करण्यात यावी.

1. सर्व संस्थांनी, डीबीटी पोर्टलचा लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन संस्था माहिती अंतर्गत (Institute Profile) असलेली सर्व माहिती जसे शैक्षणिक शुल्क, अभ्यासक्रमाचा तपशील इत्यादी (For example: Fee details, Course Details etc.) अचूक भरुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावी.

2. आपल्या संस्थेतील शिष्यवृतीच्या विविध योजनांसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जांची तपासणी करून पुढील प्रक्रिया करण्यात यावी.
3. संस्थांनी उपरोक्त योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून द्यावी जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही.
4. विद्यार्थी केंद्र शासनाच्या (NSP Portal) व महाराष्ट्र शासनाच्या (DBT Portal) पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्था प्रमुखांनी स्वतः योग्य ती दक्षता घ्यावी. संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले अर्ज संस्था स्तरावर तपासणीसाठी प्रलंबित राहील्यास **किंवा**
5. विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन-दोन शिष्यवृत्ती योजनांचा (केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही शिष्यवृत्ती योजनांचा) लाभ प्राप्त करुन घेतल्यास **किंवा**
6. संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास **किंवा**
7. संस्थेमध्ये TFWS अंतर्गत प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखांची राहील, याची नोंद घ्यावी.

शिष्यवृत्ती प्रक्रियेचे नियंत्रण करण्यासाठी आपल्या जिल्हयातील शासकीय तंत्रनिकेतन/अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय संस्थांच्या प्राचार्यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. नोडल अधिकारी यांनी वेळोवेळी आयोजित केलेल्या बैठकांना हजर राहून त्यांनी दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

आपल्या संस्थेमध्ये प्रवेशित व उपरोक्त योजनांसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून महाडीबीटी पोर्टलवर अर्ज (नवीन/नुतनीकरण) लवकरात लवकर भरुन घेण्याबाबत व संस्थास्तरावर अर्ज प्रलंबित न ठेवता तात्काळ कार्यवाही करुन अर्ज पुढे पाठविण्याबाबत विद्यार्थ्यांना सुचित करावे. अर्ज तपासताना संबंधित योजनांच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनूसार काटेकोरपणे तपासणी करुन अर्ज तात्काळ निकाली काढावे.

ऑनलाईन पध्दतीने मंजुर केलेले अर्ज महाडीबीटीच्या पोर्टलवर पाठविणे. तसेच सदर प्रक्रिया विहित कालावधीत पूर्ण करणे याबाबतची जबाबदारी आपली राहील, याची नोंद घ्यावी.

(उमेश नागदेवे)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

प्रत: 1. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.